## वार्ता टिपंण ता. ३०/०७/२०१८

### रांका ज्वेलर्सच्या सुमारे दिड कोटी रुपयांचा जबरी चोरीचा गुन्हा ४८ तासात उघड

इसम नामे अजय मारुती होगाडे वय २१ वर्षे धंदा नोकरी रा. सायन,कोळीवाडा,भंडारवाडा,रुपम सिनेमॅक्स थिएटरजवळ,रोड नं.२५,रुम नं.१०१ सायन मुंबई २२. मुळे रा.रायगडवाडी,पोस्ट पाचाड,ता.महाड,जि.रायगड हे सुमारे तिन महीन्यांपासुन रांका ज्वेलर्स काळबा देवी मुंबई येथे ऑफीस बॉय म्हणुन नोकरी करतात. दि.२६/०७/२०१८ रोजी ते मुंबई येथुन सोन्याचे दागीने व डायमंड असलेले सोन्याचे दागीने असे किंमत रुपये १,४८,५०००/- चे पार्सल सॅकमध्ये घेवुन मुंबई येथुन पुणे येथे रेल्वेने दि.२७/०७/२०१८ रोजी रात्रौ ०१/१५ वा.सुमा. पुणे स्टेशन येथे आले. ते ०६ नंबर प्लॅटफॉर्मच्या पलीकडे म्हणजे ताडीवाला रोडच्या दिशेने खाली उतरले. त्यांना ०३ ते ०४ अनोळखी इसमांनी मारहाण करुन,त्यांच्या पोटावर पुढील बाजुस व पाठीवर चाकुने वार करुन जखमी करुन त्यांच्याकडे सोन्याचे व डायमंडचे दागीन्यांचे सॅक घेवुन पळुन गेले त्याबाबत वर नमुद इसमानी दिलेल्या फिर्यादी वरुन बंडगार्डन पोस्टे येथे गुरनं. २०४/२०१८ भादवि कलम ३९४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्याचा तपास वरीष्ठ पोलीस निरीक्षक बंडगार्डन पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

वर नमुद दाखल गुन्हा गंभीर स्वरुपाचा व उघडकीस आणण्याच्या दृष्टीने आव्हानात्मक असल्याने,सदर गुन्ह्याच्या तपासासाठी मा.पोलीस आयुक्त श्रीमती रश्मी शुक्ला मॅडम यांनी गुन्हे शाखेला मार्गदर्शनपर सुचना देवुन कार्यन्वीत केले होते. त्यानुसार गुन्हे शाखेचे खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ जाधव व त्यांचे पथक यांनी वर नमुद फिर्यादी इसम अजय होगाडे याच्याकडे गुन्ह्यासंबंधाने कसुन तपास केला.

तपासादरम्यान पोलीस उपायुक्त श्री पंकज डहाणे सो,सहा.पोलीस आयुक्त श्री समीर शेख सो,खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री.रघुनाथ जाधव यांनी फिर्यादी श्री अजय होगाडे याच्या पाठीवर व पोटावर झालेल्या जखमा ह्या चाकुने वार केल्यानंतर होणा-या जखमा सदृष्य नसल्याने व तो व्यवसायासाठी पुण्यात किती वेळा आला याबाबत तसेच त्याच्या घरची आर्थीक परीस्थीतीबाबत त्याच्याकडे सलग तपास करता त्याने त्याच्या कुटुंबावर व्याजासहीत सुमारे १२ लाख रुपये कर्ज झाले ते फेडण्यासाठी त्याने.त्याच्या अंगावर सदरच्या जखमा स्वतःकरुन घेतल्या असल्याचे व वर नमुद रक्कमेचे दागीने हे त्याचा भाऊ शरद मारुती होगाडे व त्याचा मित्र अन्नु कुमार (मद्रासी) ह्यांच्या हस्ते पुणे येथुन मुंबई येथे राहते घरी पाठवुन त्याचे वडील नामे मारुती बाबु होगाडे वय ५५ वर्षे यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे कबुल केले.

त्यानंतर वर नमुद फिर्यादी याने त्याचा भाऊ शरद होगाडे,अन्नु कुमार व वडील मारुती बाबु होगाडे यांच्याशी संगनमत करुन सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन फिर्यादी अजय होगाडे व त्याचे वडील मारुती बाबुं होगाडे यांना दि.२९/०७/२०१८ रोजी अटक केली आहे.

आरोपी मारुती बाबु होगाडे यांच्याकडे केलेल्या तपासात गुन्ह्यातील मुद्देमाल त्याचे मुळगांव मु.रायगडवाडी,पोस्ट पाचाड,ता.महाड,जि.रायगड येथे डोंगर पायथ्याला खड्डा करुन त्यात सदरचा दागिने असलेला डबा लपवुन ठेवला असल्याचे ०२ पंचासमक्ष वर नमुद किंमतीचे सोन्याचे व डायमंडचे दागिने (जसेचे तसे ) सविस्तर पंचनाम्याने दि.२९/०७/२०१८ रोजी जप्त करण्यात आलेले आहेत.

**सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्रीमती रश्मि शुक्ला मॅडम, मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर श्री.रविंद्र कदम सो, गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त श्री.प्रदीप देशपांडे सो,पोलीस उपायुक्त श्री. पंकज डहाणे सो, सहा. पोलीस**

आयुक्त श्री. समीर शेख सो यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री.रघुनाथ जाधव, पोलीस उपनिरीक्षक राहुल घुगे, पोलीस कर्मचारी प्रमोद मगर, धिरज भोर, मंगेश पवार,फिरोज बागवान, अविनाश मराठे, रमेश गरुड, उदय काळभोर, सुधीर इंगळे, एकनाथ खंदारे, महेश कदम, मनोज शिंदे, प्रदीप शिंदे, शिवानंद बोले, संतोष मते, नारायण बनकर यांनी केली आहे.




खंडणी विरोधी पथक,